VOL- IX ISSUE- IX SEPTEMBER 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

# समाज मनावर संस्कार करणाऱ्या एकांकिका : रंग एकतेचा व काही एकांकिका

**प्रा.डॉ. व्यंकटी पावडे**
मराठी विभाग प्रमुख,
के. आर. एम. महिला कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, नांदेड
ई-मेल: vyankatipawde@gmail.com

शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे ही विद्यार्थ्यांच्या मनावर संस्कार रुजविणारी आधुनिक संस्कार केंद्रे आहेत. या संस्कार केंद्रांची पायाभरणी इतर भाषिक साहित्याबरोबरच मराठी साहित्यावर अवलंबून असते. प्राथमिक शाळांमधून बालमनावर अनेक प्रकारचे संस्कार केले जातात. खरंतर या संस्कारामधून बालकांचे मनोविश्व घडत असते. ज्या देशातील साहित्य संपन्न असते, तेथील नवीन पिढी ही संस्काराने भरभक्कम असते; म्हणून माणूस घडविणारे बालसाहित्य लिहिणे अत्यंत गरजेचे आहे. कोवळ्या बालमनावर होणारे संस्कार त्या देशाचे भवितव्य असते. बालकथा, कविता, कादंबरी,नाटक आणि एकांकिका यामधून नकळत बालकांचे मनोविश्व घडत असते. मराठी साहित्यात बालसाहित्याची एक परंपरा आहे. ही परंपरा अधिक विस्तृत करणे काळाची मोठी गरज आहे. या जगात दुसऱ्यासाठी जगणे, परोपकार करणे, मानवता रुजवीणे, सृष्टीतील निसर्गावर प्रेम करणे हे आपणास प्राथमिक शाळेत असणाऱ्या अभ्यासक्रमांमधून नकळतपणे कळत जाते. त्यामुळे सकस बालसाहित्य येणे अपेक्षित आहे.

कोणत्याही समाजात संस्कारमूल्ये रुजवायचे असतील तर तेथील साहित्य सामाजिक प्रश्नांची जाण असणारे असणे गरजेचे आहे. कारण समाजाला सामाजिक भान देण्याचे कार्य साहित्याच्या माध्यमातून होत असते. सदाचारी परोपकारी व नीतिमान समाज निर्माण करण्यात साहित्याची भूमिका खूप मोलाची ठरते. ज्या समाजाचे साहित्य तकलादू असते, तो समाज नैतिकदृष्ट्या उभा राहू शकत नाही; म्हणून साहित्य आणि समाज यांचा अनुबंध अत्यंत महत्त्वाचा आहे. प्राचीन, अर्वाचीन आणि आधुनिक काळातील साहित्य लक्षात घेतले तर समाज परिवर्तन करण्यासाठी अनेक साहित्यिकांनी आपली लेखणी कशी झिजवली हे समजते. यामधून आपणास असे लक्षात येते की, साहित्य हे समाजातील अंधकार दूर करण्यासाठी सूर्यासारखे तळपत राहते. समाजाला योग्य दिशा देऊन योग्य मार्गावर चालण्यासाठी प्रेरित करण्याचे काम हे साहित्यातून होत असते; म्हणून समाज मन घडविण्यात साहित्याची भूमिका मोलाची ठरते. साहित्यिक नारायण शिंदे यांनी असाच एक प्रयत्न 'रंग एकतेचा व काही एकांकिका' या एकांकिका संग्रहामधून केला आहे.

यशवंतराव चव्हाण विचार मंचचे अध्यक्ष, साहित्यिक, नारायण शिंदे हे मराठवाड्यातील महत्त्वाचे ग्रामीण लेखक आहेत. सह्यागिरीचे हुंकार (यशवंतराव चव्हाण यांचे विचार संकलन), शरदाचे चांदणे (शरद पवार यांचे विचार संकलन), सपनसुगी (कथासंग्रह),सचित्र यशवंतराव चव्हाण (चरित्र), वेणू (चरित्रात्मक कादंबरी), यशवंतराव चव्हाण द्विभाषिक इत्यादी महत्त्वाचे ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. 'रंग एकतेचा व काही एकांकिका' हा सहा बालएकांकिका असणारा व वर्तमान समाज जीवनातील विषय मांडणारा आणि समाज मनावर संस्कार मूल्य पेरणारा एक महत्त्वाचा एकांकिका संग्रह त्यांनी लिहिला आहे.

साहित्यिक आणि लेखक दत्ता डांगे यांच्या सर्वदूर ओळख असणाऱ्या इसाप प्रकाशनाने, 56 पृष्ठे असणारा हा एकांकिका संग्रह प्रसिद्ध केला. अत्यंत बोलके आणि एकांकिकेचा आशय सामावून घेणारे मुखपृष्ठ भास्कर शिंदे यांनी रेखाटले आहे. सुप्रसिद्ध कवी आणि लेखक डॉ. जगदीश कदम यांच्या मलपृष्ठावरील अभिप्रायाने या एकांकिका संग्रहाला एक उंची लाभली आहे. महाराष्ट्रातील अनेक नामवंत संस्थांचे पुरस्कारही त्यांना लाभले आहेत. शेती, शेतकरी, ग्रामीण जीवन आणि तेथील परिसर यांच्याशी घट्ट नाळ जोडून असलेला हा कलावंत लेखक शेतकरी दु:खावर आणि त्यांच्या प्रश्नावर पोट तिडकेने बोलणारा व लिहिणारा आहे. आपल्या लेखणीच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणारे ते एक महत्त्वाचे लेखक आहेत.

रंग एकतेचा व काही एकांकिका या एकांकिका संग्रहास मराठवाडी बोलीभाषेचा स्पर्श झाला आहे. भारतीय समाजातील गंभीर प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या, हलक्या फुलक्या प्रसंगामधून व्यक्त होणाऱ्या, या एकांकिका इथल्या व्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्या आहेत. ग्रामीण, शहरी समाजातील आणि शैक्षणिक क्षेत्रातील प्रश्न मांडणाऱ्या या बाल एकांकिका मुलांचे मनोविश्व संस्काराने परिपूर्ण करणाऱ्या आहेत.

यशवंतरावजी चव्हाण यांच्या विचाराने भारवलेले लेखक नारायण शिंदे यांना हे जग सुंदर आणि सुखी व्हावे, असे मनोमन वाटते. खेड्यातील माणसांनी ग्रामपंचायतीच्या निवडणुकांमधून बाहेर यावे. गावाच्या भल्यासाठी झटावे. विरोधाला विरोध म्हणून कोणत्याही गोष्टीचा विरोध न करता. गावाच्या विकासासाठी कसे कार्य करावे हे 'सूर्याची किरणे' या एकांकिकांमधून नेमकेपणाने त्यानी मांडले आहे. या बाल एकांकिकांना वास्तवाचा स्पर्श झालेला आहे. समाज भान जागृत ठेवून लेखन करणाऱ्या या लेखकाने समाजातील नवे प्रश्न मांडले आहेत. सूर्याची किरणे, परिवर्तनाची पहाट, कष्टासाठीच जन्म, रंग एकतेचा, उंच भरारी, थेंबे थेंबे तळे साचे या एकांकिकांमधून समाजातील भळभळणाऱ्या वास्तव प्रश्नांना त्यांनी वाचा फोडली आहे. साहित्यिक नारायण शिंदे यांनी नव्या वर्तमानातील समस्यांचा शोध घेऊन, भारतीय समाजातील नवे प्रश्न उभे करून गावा खेड्यातील सामाजिक प्रश्नांचा वास्तवपणे वेध घेतला आहे. त्यांनी लिहिलेल्या या सहा एकांकिका ह्या तरुण कोवळ्या मनावर संस्कार रुजविणारे आहेत. शाळा, महाविद्यालयातील मुलांना नवे आत्मभान बहाल करणाऱ्या या एकांकिका नीतिमान माणूस निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या आहेत. केवळ मनोरंजन म्हणजे बालसाहित्य नाही या कल्पनेपलीकडे जाऊन त्यांनी समाजवास्तव फुला मुलांच्या भाषेत नेमकेपणाने मांडले आहे. कमीत कमी शब्दात, नेमक्या पात्रांच्या तोंडून आशयघन अर्थ पेरण्याची लकब त्यांना या एकांकिकांमध्ये सापडलेली आहे. कोणतीही एकांकिका पसरट न होऊ देता ती आशय संपन्न कशी होईल याकडे त्यांचे विशेष लक्ष आहे. बालकांचे मन लक्षात घेऊन भाषिक पातळीवर कुठेही तोल त्यांनी जाऊ दिला नाही. साधी सोपी, सहज भाषा या एकांकिका संग्रहाचे मूलभूत वैशिष्ट्ये आहे.

'कष्टासाठीच जन्म' या एकांकिकेतील कावळे दादा आणि चिऊताई यामध्ये होणारा संवाद खूप बोलका झाला आहे. ज्या झाडावर घरटे आहे ते झाड ग्रामीण भागातील शेतकरी कधीही तोडत नाही ; पण आपल्या भल्यामोठ्या बंगल्यापुढे शोसाठी झोपडी उभी करताना स्वतःला निसर्गप्रेमी म्हणणारा शहरातील ढोंगी माणूस, पक्षांचे घरटे असणारे झाड निर्दयपणे कसे सहजपणे तोडतो. आणि चार चौघात बसल्यावर गप्पा मारताना अंगणातील चिमण्या पाखर कशी नाहीशी झाली आहेत याबद्दल कशा थापा मारतो, हे विदारक सत्य भूतदयेतून लेखकाने मोठ्या तन्मयतेने मांडले आहे.

'रंग एकतेचा' ही एकांकिका भारतीय समाजातील वर्तमान समाज परिस्थितीवर भाष्य करणारी आहे. धर्माधर्मात वाढत जाणारे हेवेदावे, तेढ यामूळे माणसांची मने कशी दूषित झाली आहेत हे सत्य मांडणारी आहे.

अलीकडे धर्माधर्मातील अंतर वाढत आहे. गावातील धार्मिक वादाचे परिणाम शाळावर सुद्धा पडू लागले आहेत.शाळेतील मुला मुलांमधील मैत्री सुद्धा आपल्याच जाती धर्मातील मुलांशी असावी असा विचार आता मुलं करायला लागली आहेत. त्यामुळे समानता, बंधुभाव कसा नष्ट होत आहे हे विदारक सत्य या एकांकिकेतून लेखकाने मांडले आहे. या सर्व गोष्टीमुळे समाजात अस्वस्थता वाढीस लागून अनेक सामाजिक प्रश्न उभे राहत आहेत हे सत्य लेखकाने नेमकेपणाने हेरले आहे.

या एकांकिका सभोवताली घडणाऱ्या मानवी जीवनाशी संबंधित आहेत. समाजातील वास्तव प्रश्नांची त्या निगडित आहेत म्हणून त्या प्रत्येकाला माझ्याच भावजीवनाशी संबंधित आहेत असे वाटते. शेवटी साहित्याचे प्रयोजन हे समाजाचे प्रतिबिंब उभे करणे हेच असते. लेखक नारायण शिंदे यांनी आपला भोवताल एका वेगळ्या बाल मनोविश्वात जाऊन नेमकेपणाने पकडला आहे. हे भावविश्व उभे करताना, त्यांनी समाजातील समस्यांची उकल केली आहे. केवळ सामाजिक प्रश्नांची मांडणी करणे हे लेखकाचे काम नसते तर सामाजिक प्रश्न समजून घेऊन त्या समस्येवर उपाय शोधणे आणि ती समस्या निवारण करण्यासाठी लोक मनावर एक संस्कार पेरणे हे साहित्यिकाचे खरे काम असते. खरंतर साहित्याचे प्रयोजन असेच असायला हवे या एकांकिका संग्रहाच्या माध्यमातून लेखकाने समाज मनावर संस्कार मूल्य पेरण्याचे म्हणणे कार्य केले आहे.

'परिवर्तनाची पहाट' या एकांकिकेतून त्यांनी एम.बी.बी.एस. पास असलेल्या परंतु एम.पी.एस.सी. या स्पर्धा परीक्षांकडे वळणाऱ्या, दोन डगरीवर पाय देणाऱ्या स्वार्थी तरुणांचा संधीसाधूपणा चित्रित केला आहे. अशा फसव्या मुलांमुळे डॉक्टर पदवीला एक अन्य तरुण कसा कायमचा मुकतो हे वास्तव मांडले आहे. या एकांकिकेत आदर्श शिक्षक आणि त्यांचा विद्यार्थी असणारा संचालक येतो. या दोहोंमध्ये होणारा संवाद वाचक जेव्हा वाचायला लागतो, तेव्हा त्याचे अंतरंग हेलावते. शेवटी हा आदर्श शिक्षक हतबल न होता हा नियम कसा खोटा आहे. तो व्यासंगी विद्यार्थ्यांवर अन्याय करणार आहे. हे आपल्या संचालक असणाऱ्या विद्यार्थ्यांना पटवून देऊन तो नियम बदलण्यासाठी आग्रह करतो. त्यावेळी महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष आणि सामाजिक प्रश्नांची जाण असणारे उपमुख्यमंत्री मा. आर. आर. पाटील त्यास कशी मान्यता देतात हे प्रखरपणे मांडले आहे. हे स्पष्ट करताना कोणत्याही राज्याचा राज्यकारभार सुरळीत चालण्यासाठी तेथील राज्यकर्ते किती सजग आणि सामाजिक भान असणारे असायला हवेत हेही नमूद करतात. म्हणून या एकांकिकांमधून समाजातील, शैक्षणिक, आणि आर्थिक प्रश्न प्रखर वास्तवपणे त्यांनी मांडले आहेत.

'उंच भरारी' या एकांकिकेतील शिवा हा तरुण एका खेड्यात वाढलेला शेतकऱ्याचा मुलगा आहे. त्याच्याकडे महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी पैसे नाहीत. घरात अठराविश्व दारिद्र्य आहे. या दारिद्र्यात खितपत न पडता. आपल्या शेतामधील बांधावर असणाऱ्या आंब्याच्या चार झाडांची तप्त उन्हात तो राखण करतो. मोबाईलच्या साह्याने सोशल मीडियावर त्याची योग्य जाहिरात करून 60000 रूपये मिळवतो आणि पुढील शिक्षणासाठी सज्ज होतो. तेव्हा लेखकाने हातातील मोबाईल योग्य वापर केला तर त्याचा व्यावसायिक उपयोग कसा घेता येईल हे सत्य सांगितले आहे. शिवा हा एक प्रतीक आहे. ज्याने सोशल मीडियाचा वापर आपल्या व्यवसायासाठी केला; परंतु आज आपल्या देशात कोट्यावधी तरुण अशी आहेत की, या सोशल मीडियाचा वापर ते केवळ मनोरंजनासाठी करतात. असे न होता या तंत्राचा वापर आपण आपल्या भल्यासाठी आणि सामाजिक विकासासाठी करावा हे वास्तव सत्य लेखकाने मांडले आहे. या एकांकिकेतील वर्णन करताना लेखक नारायण शिंदे हे कमालीचे भावूक होतात. शेती, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि शेतीवर आधारित असणाऱ्या शिक्षित तरुणांच्या समस्या ते वास्तवपणे मांडतात.

पाणी बचतीवर भाषणे देणारी, शहरातील उंच उंच इमारतीत (अपार्टमेंटमध्ये) राहणारी लबाड माणसे. आपल्या घरातील नळाची थेंब थेंब गळणारी तोटी बंद करण्यासाठी कशी टाळाटाळ करतात. हे 'थेंबे थेंबे तळे साचे' या एकांकिकेतून मांडले. एका लहान निष्पाप कोवळ्या मुलाचा पाणी भरण्यासाठी गेला असताना टँकरवरून पडल्यामुळे त्याचा कसा मृत्यू होतो हा भावनिक प्रसंग दाखवून पाणी समस्येच्या प्रश्नांवर लेखकाने नेमके भाष्य या एकांकिकेमधून केलेले आढळते.

लेखक नारायण शिंदे यांनी लिहिलेल्या या सहा एकांकिकांना मानवी करूनेचा स्पर्श झाला आहे. मानवता, सदाचार, सेवावृत्ती आणि एकता ही संस्कार मूल्य बालकांच्या मनावर रुजविण्यासाठी त्या धडपड करणाऱ्या आहेत. कल्पना आणि वास्तव या दोन पायांवर उभ्या असणाऱ्या या एकांकिका वाचकांच्या मनात प्रश्न उभ्या करणाऱ्या आहेत. आपल्या कोशात वावरणाऱ्या स्वार्थी व्यवस्थेची चिरफाड करणाऱ्या या एकांकिका जगण्याचा नवा संदेश देणाऱ्या आहेत. शेवटी साहित्याला नेमके परिवर्तन तरी काय हवे असते. समाज मनात बदल घडवणे. या सृष्टीतील माणसांना सदाचारी, परोपकारी, नीतिमान बनवणे हेच अंतिम ध्येय कोणत्याही साहित्याचे असते. लेखक नारायण शिंदे यांचा हा एकांकिका संग्रह समाजमनात नव्या जीवन मूल्यांची पेरणी करणारा, मराठी साहित्याची वाट रुंद करणारा आणि परिवर्तनवादी समाज घडविणारा आहे.

निश्चितच या एकांकिका संग्रहाचे लेखक, वाचक, समीक्षक,तरुण स्वागत करतील तसेच शाळा, महाविद्यालयांमधून शिक्षक वर्ग विद्यार्थ्यांसमोर पारायणे करतील. ही आशा आहे.

**संदर्भ :**


- रंग एकतेचा व काही एकांकिका, नारायण शिंदे,इसाप प्रकाशन नांदेड, इ.स. 11 सप्टेंबर 2022, पृष्ठ संख्या 56